दैनिक
# महा मेट्रो

www.mahametronews.in

वर्ष ४ थे : अंक : ६ पुणे, शनिवार, २३ ऑगस्ट २०२५ | पाने : ४ किंमत : ३.००

RNI NO.MAHMAR2022/87390

VOL NO.04. ISSUE : 6 Pune, Saturday, 23 August 2025 | Pages : 4 PRICE : 3.00

# पुणे महापालिकेचा प्रारूप प्रभाग रचना जाहीर

## नदी, महामार्गांची विभागणी; भाजपचा वरचष्मा, ४१ प्रभागांतून १६५ नगरसेवक



**पुणे । प्रतिनिधी**

गेल्या अनेक दिवसांपासून रखडलेल्या पुणे महापालिकेच्या निवडणुकांसाठी अखेर प्रारुप प्रभाग रचना जाहीर झाली आहे. या घोषणेमुळे निवडणूक प्रक्रियेला वेग मिळणार असून, पुणेकरांमध्येही उत्सुकता निर्माण झाली आहे. शहरात एकूण ४१ प्रभाग असणार असून, यातून १६५ नगरसेवक निवडून येणार आहेत. ४० प्रभाग चार सदस्यीय असतील तर एक प्रभाग पाच सदस्यीय असणार आहे. या रचनेबाबत हरकती व सूचना ३ सप्टेंबरपर्यंत स्वीकारल्या जाणार आहेत.

**२०११ च्या जनगणनेवर आधारित प्रभाग रचना**

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ही प्रभाग रचना २०११ च्या जनगणनेच्या आधारे करण्यात आली आहे. त्यावेळी पुणे शहराची लोकसंख्या ३४ लाख ८१ हजार ३५९ इतकी नोंदवली गेली होती. या लोकसंख्येच्या हिशोबाने शहरातील प्रभाग विभागणी करण्यात आली आहे. प्रत्येक प्रभागात साधारणतः ९० ते ९५ हजार मतदार असतील, असे प्रशासनाचे म्हणणे आहे.

**सर्वात मोठा आणि सर्वात लहान प्रभाग**

या नव्या आराखड्यात आंबेगाव–कात्रज हा प्रभाग सर्वात मोठा ठरणार असून, त्यात तब्बल १ लाख १४ हजार ९७० नागरिकांचा समावेश होणार आहे. तर दुसरीकडे अप्पर सुपर इंदिरानगर हा फक्त ७५ हजार ९४४ लोकसंख्येसह सर्वात लहान प्रभाग ठरणार आहे. यामुळे या भागांतील राजकीय स्पर्धाही वेगळीच रंगण्याची शक्यता आहे.

प्रभाग क्रमांकांची मांडणीही जाहीर झाली आहे. कळस–धानोरी हा पहिला क्रमांकाचा प्रभाग असणार असून, महंमदवाडी–उंड्री हा शेवटचा म्हणजेच ४१वा प्रभाग ठरणार आहे. यामुळे पूर्व–पश्चिम व उत्तर–दक्षिण पुण्यातील प्रभागांची संतुलित विभागणी करण्यात आल्याचे प्रशासनाचे म्हणणे आहे.

**हरकती व सूचना दाखल करण्याची मुदत**

जाहीर झालेल्या प्रारुप प्रभाग रचनेसंदर्भात नागरिकांना हरकती आणि सूचना नोंदवता येणार आहेत. या हरकती लेखी स्वरूपात द्याव्या लागणार असून, त्या २२ ऑगस्ट ते ३ सप्टेंबर २०२५ या कालावधीत

पान ३ वर...

### निवडणुका दिवाळीनंतरच

**राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका अनेक कारणांमुळे गेल्या काही काळापासून पुढे ढकलल्या गेल्या होत्या. विशेषतः ओबीसी आरक्षण आणि प्रभाग रचना यासंदर्भातील न्यायालयीन सुनावण्या प्रलंबित असल्यामुळे निवडणुका होऊ शकल्या नव्हत्या. आता मात्र सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट आदेश दिल्यामुळे निवडणूक आयोगाने दिवाळीनंतर निवडणुका होणार असल्याचे जाहीर केले आहे. त्याचाच भाग म्हणून आज पुणे महापालिकेची प्रभाग रचना जाहीर करण्यात आली.**

पुणे महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी शुक्रवारी सायंकाळी पुणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ चा आराखडा सादर केला. पुणे महानगरपालिका क्षेत्राची एकूण लोकसंख्या २०११ च्या जनगणनेनुसार ३४ लाख ८१ हजार ३०९ इतकी आहे. यामध्ये अनुसूचित जातींची लोकसंख्या ४ लाख ६८ हजार ६३३ तर अनुसूचित जमातींची लोकसंख्या ४० हजार ६८७ इतकी आहे.

निवडून द्यावयाच्या महापालिका सदस्यांची संख्या १६५ असून त्याप्रमाणे महापालिका निवडणूक आयोगाने एकूण ४१ प्रभागांची रचना केली आहे. यामध्ये ४० प्रभागात प्रत्येकी ४ सदस्य तर एका प्रभागात ५ सदस्य असतील. प्रत्येक प्रभागातील सरासरी मतदारसंख्या ८४ हजार इतकी असून पाच सदस्यीय प्रभागात १ लाख ५ हजार ४९५ इतकी मतदारसंख्या आहे.

पुणे महापालिकेच्या एकूण ४१ प्रभागांपैकी कळस–धानोरी व सुस–बाणेर–पाषाण या दोन प्रभागांमध्ये अनुसूचित जमातींची मतदारसंख्या जास्त असल्याने हे प्रभाग अनुसूचित जमातींसाठी राखीव असणार आहेत. तसेच कळस–धानोरी प्रभागात अनुसूचित जातींची मतदारसंख्या १८ हजारांपेक्षा अधिक असल्याने येथे एक सदस्य अनुसूचित जातींसाठी राखीव राहील. त्याचबरोबर या प्रभागात इतर मागासवर्गीयांसाठी एक सदस्य, तसेच खुल्या गटासाठी महिला व पुरुष प्रत्येकी एक सदस्य निवडून येणार आहेत.

याशिवाय पुणे महापालिकेतील फुलेनगर नागपूर चाळ, येरवडा गांधीनगर, गोखलेनगर–वाकडेवाडी, औंध–बोपोडी, पुणे स्टेशन–जय जवाननगर, रामटेकडी–माळवाडी, काशेवाडी–डायस प्लॉट, नवी पेठ–पर्वती जनता वसाहत, हिंगणे खुर्द–सहकारनगर–पद्मावती, आंबेगाव–कात्रज, अपर–सुप्पर–इंदिरानगर या प्रभागांत अनुसूचित जातींसाठी प्रत्येकी एक सदस्य आरक्षित असणार आहे.

यासोबतच पुणे शहराच्या उपनगरांमध्ये इतर मागासवर्गीयांसाठी काही जागा राखीव राहणार आहेत. एकूण आरक्षणानुसार अनुसूचित जातींसाठी २२ प्रभाग, इतर मागासवर्गीयांसाठी ३४ प्रभाग आणि अनुसूचित जमातींसाठी २ प्रभाग राखीव आहेत. उर्वरित प्रभागांमध्ये खुल्या प्रवर्गातून एक पुरुष आणि एक महिला अशी व्यवस्था असेल.

पुणे महापालिकेची ही प्रारूप प्रभागरचना असली तरी यात बदल होण्याची शक्यता कमी असल्याचे आजवरच्या इतिहासावरून दिसते. संपूर्ण शहराच्या प्रभागरचनेत भारतीय जनता पक्षाचे वर्चस्व जाणवते. या प्रभागरचनेमुळे काही प्रस्थापितांना धक्का बसल्याचे दिसते. निवडणुकीत गुणवत्ता, पैसा व संघटनशक्ती या आधारांवरच विजय मिळवणे सोपे होणार आहे.

पूर्वीच्या एक सदस्यीय पद्धतीत एखादा गरीब, सुशिक्षित उमेदवार सहज निवडून येऊ शकत होता. मात्र ''मिनी विधानसभा'' समजल्या जाणाऱ्या या प्रभागरचनेत राष्ट्रीय पक्षांचे उमेदवार निवडून येणे तुलनेने सोपे होईल. विशेषतः केंद्र व राज्यातील सत्ताधाऱ्यांना ही निवडणूक अनुकूल जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

प्रभागरचनेत कोणाचाही हस्तक्षेप नसल्याचे सांगितले जात असले तरी भारतीय जनता पक्षाचा हस्तक्षेप झाल्याचे चित्र दिसते. या प्रभागरचनेत उपमुख्यमंत्री व पालकमंत्री अजित पवार यांच्याही सूचना घेतल्या गेल्याचे दिसून येते. वडगाव शेरी, हडपसर तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचा प्रभाव असलेल्या इतर मतदारसंघांमध्ये प्रभागरचनेत तोडमोड झाल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे भाजपला निवडणूक सोपी व्हावी व त्यांच्या माजी नगरसेवकांना फायदा व्हावा म्हणून ही रचना केल्याचा आरोप विरोधकांकडून करण्यात येत आहे.

## महत्वाचे...

### खोटे दस्तऐवज तयार करून २५ लाखांचा गंडा

**पुणे । प्रतिनिधी**

चाकण येथील आदिराज मॅनपॉवर सर्व्हिसेस प्रा. लि. कंपनीत तब्बल २५ लाखांहून अधिक रुपयांची फसवणूक झाल्याचे समोर आले आहे.कंपनीत सुपरवायझर म्हणून काम करणारा सिद्धाराम बसवराज रहे आणि अकाउंटंट विनोद आगरकर यांनी संगनमत करून खोटे दस्तऐवज व खोटा हिशोब तयार केला. रजा रोखीकरणाच्या बिलामध्ये बनावट कामगारांची नावे दाखवून ते बिल मंजूर करून घेतले व मंजूर रक्कम आपसात वाटून घेतली. या फसवणुकीत एकूण २५ लाख ४८ हजार ४९० रुपयांचा गंडा घातल्याचे उघड झाले. या प्रकरणी चाकण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला असून आरोपींवर कारवाई सुरू आहे.

### फ्लिपकार्टच्या नावाखाली १ लाखांची फसवणूक

**पुणे । प्रतिनिधी**

काळेवाडी परिसरात फ्लिपकार्ट कस्टमर केअरमधून बोलत असल्याचे सांगून एका महिलेला तब्बल १ लाख ३ हजार ५५३ रुपयांचा गंडा घालण्यात आल्याची घटना उघडकीस आली आहे.१३ जानेवारी रोजी दुपारी अज्ञात व्यक्तीने मोबाईलवर संपर्क साधून ''कॅश ऑन डिलीवरी होत नाही, ऑनलाईन पेमेंट करा'' असे सांगत विविध ठग स्कॅनर पाठवले. वेगवेगळ्या कारणांनी पैसे पाठवण्यास भाग पाडत संशयितांनी महिलेकडून तब्बल एक लाखांहून अधिक रक्कम उकळली.या प्रकरणी काळेवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास पोलीस निरीक्षक सुरेंद्र धुमाळे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

### मिक्सर गाडीच्या धडकेत तरुणाचा दुर्दैवी मृत्यू


**पुणे । प्रतिनिधी**

जुना मुंबई–पुणे महामार्गावर तळेगाव दाभाडे परिसरात झालेल्या अपघातात एका २५ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला आहे.२० ऑगस्टच्या रात्री बाणेरहून दुचाकीवरून घरी येत असताना मयुर हॉटेलजवळ मिक्सर गाडी (एमएच–११/ एएल–७३३५) ने दुचाकीला जोरदार धडक दिली. या धडकेत वैभव ओसवाल (वय २५) गंभीर जखमी होऊन जागीच ठार झाला. अपघातानंतर पोलिसांनी चालक प्रवेशकुमार साकेत (रा. मध्यप्रदेश) यास ताब्यात घेतले असून पुढील तपास सुरू आहे.

### रावेतमध्ये देशी पिस्तूल, जिवंत काडतूस जप्त

**पुणे । प्रतिनिधी**

रावेत परिसरात पोलिसांनी केलेल्या कारवाईत एका युवकाकडून देशी बनावटीचे पिस्तूल आणि जिवंत काडतूस जप्त करण्यात आले आहे.२१ ऑगस्ट रोजी मध्यरात्री स्वप्नपूर्ती फेज–२ इमारतीजवळ बीआरटी रोड पुलाखाली ही कारवाई करण्यात आली. पोलिसांनी संदीप रामदुलारे कुमार (वय २२, रा. पुनावळे, मूळ उत्तरप्रदेश) यास अटक केली.त्याच्या ताब्यातून ५० हजार रुपये किमतीचे देशी पिस्तूल व एक जिवंत काडतूस मिळून आले. प्रतिबंध असूनही शस्त्र बाळगल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.



## 'मास्क मॅन' नावाने ओळखला जाणारा व्यक्ती भरदिवसा चाकूसह वावरला

**चिंचवड । प्रतिनिधी**

पिंपरी–चिंचवड शहरात दिवसाढवळ्या नागरिकांच्या सुरक्षेला मोठे आव्हान उभे राहिले आहे.

'मास्क मॅन' नावाने ओळखला जाऊ लागलेला एक अज्ञात व्यक्ती भरदिवसा हातात धारदार चाकू घेऊन रस्त्यांवर वावरताना दिसला असून, यामुळे संपूर्ण शहरात खळबळ उडाली आहे. निगडी परिसरात बजाज ऑटोमोबाईल समोरील एचपी पेट्रोल पंपाजवळ नागरिकांना त्याचा प्रत्यक्ष अनुभव आला. चेहऱ्यावर मास्क घालून ओळख लपवणारा हा व्यक्ती चाकू घेऊन रस्त्यावरून जात असल्याचे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. व्हिडिओमध्ये स्पष्टपणे

पान ३ वर...

## हनी ट्रॅपवाल्या प्रफुल्ल लोढाला पिंपरी पोलिसांकडून अटक

**पुणे । प्रतिनिधी**

हनी ट्रॅप आणि लैंगिक अत्याचार प्रकरणातील प्रफुल्ल लोढाला पिंपरी- चिंचवडच्या बावधन पोलिसांनी अटक केली आहे. बावधन पोलीस ठाण्यात ३६ वर्षीय पीडित महिलेने प्रफुल लोढाविरोधात अत्याचार केल्या प्रकरणी तक्रार दिली होती.



या गुन्ह्यातील तपासाठी बावधन पोलिसांनी लोढाला ताब्यात घेतलं आहे. प्रफुल्ल लोढाला बावधन पोलिसांच्या स्वाधीन करण्यात यावं म्हणून कोर्टाला हस्तांतरित वॉरंट मागण्यात आलं होतं. ती मंजुरी मिळताच आज सकाळी ऑर्थर रोड कारागृहातून ताब्यात घेण्यात आलं.

काही वेळापूर्वी बावधन पोलिसांनी अटकेची कारवाई पूर्ण केली, आता थोड्यावेळात त्याला न्यायालयात हजर केलं जाईल.

२७ मे २०२५ रोजी पुण्यातील बालेवाडी येथील नामांकित हॉटेलमध्ये महिलेला बोलवून तिच्यावर लैंगिक अत्याचार केले होते. प्रफुल्ल लोढाने पीडित महिलेच्या पतीला नोकरी लावतो असे आमिष दाखवून हॉटेलवर बोलवून घेऊन अत्याचार केला आहे.

याआधी मुंबईमधील अंधेरी एमआयडीसी आणि साकीनाका पोलीस ठाण्यात हनी ट्रॅप आणि अल्पवयीन मुलींवर अत्याचार

पान ३ वर...



## सोलापूर–पुणे महामार्गावर अज्ञात वाहनाची दुचाकीला धडक ; तरुण जागीच ठार

**मोडनिंब । प्रतिनिधी**

सोलापूर – पुणे महामार्गावरील शेटफळ गावाजवळ उड्डाण पुलावर भीषण अपघात झाला.

वडाचीवाडी येथे जात असलेला ३० वर्षीय दुचाकीस्वार बापू हरिबा निळे (रा. वडाचीवाडी, ता. माढा, जि. सोलापूर) याच्या दुचाकीला ( चक४५ अढ ०२६०) भरधाव अज्ञात वाहनाने जोरदार धडक दिली. धडकेनंतर दुचाकीस्वार रस्त्यावर पडला आणि त्या अज्ञात वाहनाचे टायर त्याच्या डोक्यावरून गेले. यामुळे त्याचा जागीच मृत्यू झाला.

ही घटना आज (दि. २२) सकाळी साडे दहाच्या सुमारास घडली. अपघाताची माहिती मिळताच वरवडे टोल प्लाझा येथील ग्रस्तीपथकाचे प्रमुख उमेश भोसले व त्यांच्या सहकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. मोहोळ येथून खासगी रुग्णवाहिकेद्वारे मृतदेह मोहोळ शासकीय रुग्णालयात शवविच्छेदनासाठी

पान ३ वर...

# ना मानाचे ना कामाचे, मान फक्त बाप्पाचा!

## पुण्यातील गणेशोत्सवाच्या वादाची ठिणगी अखेर शमली



**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील गणेशोत्सवा बाबत विविध चर्चा शहरात सगळीकडे रंगल्या होत्या. तसेच उत्सवाबाबत तसेच विसर्जन मिरवणुकीच्या संदर्भात गणेश मंडळातील वाद देखील समोर आले. याबाबत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, खासदार यांच्या पुढे गणेश मंडळांनी त्यांचे प्रश्न मांडले. अखेर आज पुण्यातील सर्किट हाऊस येथे झालेल्या सर्व गणेश मंडळांच्या बैठकीमध्ये तोडगा काढण्यात आला असून मानाचे गणपती विसर्जन मिरवणुकीमध्ये सकाळी साडेनऊ वाजता सहभागी होतील; असा निर्णय झाल्यानंतर सगळ्याच गणेश मंडळांनी आनंद व्यक्त केला आहे.


गणेशोत्सव अवघ्या काही दिवसांवर आहे. यासाठी गणेश मंडळांची देखील तयारी सुरु आहे. मात्र पुण्यातील गणेशोत्सवाबाबत गेल्या काही दिवसांपासून विविध चर्चा रंगू लागल्या होत्या. मात्र गणेशोत्सवाच्या वादाची ठिणगी अखेर आजच्या बैठकीनंतर शमली आहे. बैठकीला शहरातील मानाच्या पाचही गणपती मंडळांचे प्रमुख उपस्थित असताना त्यांनी सुद्धा विसर्जन मिरवणुकीत १ तास आधी सहभागी होण्याचा निर्णय घेतला.

विसर्जन मिरवणुकीच्या वेळेच्या बाबत सुरू असलेल्या चर्चेबाबत मोहोळ म्हणाले, मानाचे गणपती सकाळी ९.३० वाजता मिरवणूक सुरू करतील. विसर्जन मिरवणुकीत ढोल पथकांची संख्या कमी केली जाईल. तसेच सगळ्या मिरवणुकीत स्थिर वादन कोणी करणार नाही. पुण्यातील मिरवणूक वेळेत संपवायला हवी ही सगळ्या गणेश मंडळांची भूमिका होती. त्यानुसार मिरवणूक कमी वेळेत संपन्न होईल.

विद्युत रोषणाईचे मंडळ सायंकाळी सातनंतर मिरवणुकीत

खासदार मुरलीधर मोहोळ यांनी सांगितले, कि कुठलेही मनभेद नव्हते. संवाद होणे अपेक्षित होतं आणि आज तो झाला. आमच्यामध्ये मिरवणुकीच्या निमित्ताने दोन

पान ३ वर...



## माजी क्रिकेटपटू विनोद कांबळींची प्रकृती चिंताजनक

**मुंबई । प्रतिनिधी**

भारतीय क्रिकेट संघाचा माजी स्टार फलंदाज विनोद कांबळी यांची प्रकृती गंभीर असल्याचे वृत्त समोर आले आहे. त्यांचा भाऊ वीरेंद्र कांबळी यांनी दिलेल्या माहितीनुसार, विनोद कांबळींना सध्या नीट बोलता आणि चालता येत नाही. जरी ते सध्या घरी असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे सांगितले गेले तरी त्यांच्यावर उपचार सुरूच आहेत. तो एक चॅम्पियन आहे, नक्कीच पुनरागमन करेल. त्याला चाहत्यांच्या प्रार्थनेची आणि पाठिंब्याची गरज आहे, असे भावनिक आवाहन वीरेंद्र कांबळींनी केले आहे.

**गंभीर आजारपणाची समस्या**

काही महिन्यांपूर्वी विनोद कांबळींना लघवीच्या संसर्गामुळे

पान ३ वर...

संपादकीय....

# गुन्हेगारी टोळ्यांमध्ये विधी संघर्षीत बालकांची संख्या अधीक

शहर व उपनगरात किरकोळ गुन्ह्यांपासून ते गंभीर गुन्ह्यांमध्ये अल्पवयीन मुलांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. उपनगरात शाळा गळीतीचे वाढते प्रमाण, बेरोजगारी, व्यसनाधिनतेमध्ये अडकलेल्यांना गुन्हेगारी टोळ्या त्यांना हेरतात. त्यांना टोळीमध्ये समावून घेऊन दररोज त्यांना जेवण, मद्यपानाची व्यवस्था करतात. त्यानंतर हळू हळू त्यांच्याकडून किरकोळ गुन्ह्यांपासून ते गंभीर गुन्ह्यापर्यंतचे गुन्हे करवून घेतात. त्यानंतर अशा टोळ्या परिसरात आपले वर्चस्व वाढवत असल्याचे चित्र आहे.

कमी वयात हातून किरकोळ आणि गंभीर गुन्हा झालेल्या मुलांना 'विधी संघर्षित बालक' संबोधले जाते. पुणे जिल्ह्यात येरवड्यात विधी संघर्षीत मुलांसाठी पंडित जवाहरलाल नेहरू उद्योग केंद्र (बाल सुधार गृह) आहे. राज्यात जवळपास प्रत्येक जिल्ह्यात मुलांसाठी निरीक्षण गुहे आहेत. येरवडा येथील सुधार गृहात विशेष आणि निरीक्षण असे दोन गृहे आहेत. गेल्या वर्षात बाल सुधार गृहात एकूण तीनशे मुलांना दाखल करण्यात आले आहे. यामध्ये खून, खुनाचा प्रयत्न,चोरी मारामारी सारख्या गंभीर गुन्ह्यात सहभागी आहेत. गेल्या काही काळापासून बाल गुन्हेगार मुलांचे प्रमाण लक्षणीयरीत्या वाढले असल्याचे निरीक्षण आहे. बाल सुधार गृहात काही काळ ठेवल्यानंतर न्यायालयाच्या आदेशाने मुलांना मुक्त केले जाते. पण बाहेर पडल्यावर मुले पुन्हा वाईट संगती आणि व्यसनामुळे पुन्हा गुन्हेगारी मार्गाकडे वळत असल्याचे सूत्रांनी सांगितले. त्यामुळे पालक आणि नातेवाईकांनी मुलांवर चांगले संस्कार देण्यासाठी लक्ष देण्याची गरज आहे. अल्पवयीन मुलांचे गुन्ह्यातील सहभागा बद्दलची आकडेवारी चिंता वाढवणारी आहे. याचा अभ्यास केला तर अनेक राजकीय पुढाऱ्यांकडे अशा टोळ्या सक्रिय आहेत. किंवा त्यांच्या आश्रयाला अशा टोळ्यांमध्ये अल्पवयीन मुलांचा समावेश केला जातो. सध्या निवडणुकीत साम, दाम, दंड आणि भेद वापरले जात असल्यामुळे सर्वच राजकीय पक्षाच्या आश्रयाला गुन्हेगारी टोळ्या आहेत. अशा टोळ्यांना राजकीय मंडळी पोषण करतात. टोळी प्रमुख प्रमुख वस्त्यांमधील गरीब, शाळा सोडलेले, व्यसनाधिनतेमध्ये अडकलेल्यांना लक्ष करतात. त्यांना पैशाचे आमिष दाखवून त्यांना टोळीत सहभागी करून घेतला जातो. त्यानंतर त्यांचा वापर किरकोळ गुन्ह्यांपासून ते मोठ मोठ्या गंभीर गुन्ह्यांसाठी जणू प्रशिक्षणच दिले जाते.

'गेल्या काही काळापासून बाल वयात गुन्हे करणाऱ्या मुलांचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. नियमानुसार बाल गुन्हेगार मुलांना पोलिसांना अटक न करता त्यांना बाल सुधार गृहात आणले जाते.गेल्या काही वर्षांपासून मुले वेगवेगळ्या गुन्ह्याखाली केंद्रात दाखल झाले आहे. काही काळ केंद्रात राहिल्यावर त्यांची मुक्तता केली जाते. गरिबी, अशिक्षितपणा, मित्रांची वाईट संगत, व्यसनाधीनता आणि इतर कारणांमुळे गुन्हेगारीकडे किंवा हातून गुन्हा घडून जातो. मुले केंद्रात दाखल झाल्यावर त्यांचे मानसिक बदल करण्यासाठी शासनाकडून शालेय व व्यवसायिक कोर्स आणि विविध सामाजिक उपक्रम राबविले जाते. पालक आणि नातेवाईकांनी देखील मुलांना चांगले संस्कार करण्याची गरज आहे.

**विशेष गृह आणि निरीक्षण गृह म्हणजे काय ?**

अल्पवयीन वयात चोऱ्या, घरफोड्या, मारामाऱ्या आणि प्रसंगी खून व खुनाचा प्रयत्न करणाऱ्या विधी संघर्षग्रस्त (बाल गुन्हेगारांना) तुरुंगात न पाठविता बाल न्याय मंडळाच्या आदेशाने देखरेख आणि पुनर्वसनासाठी पंडित जवाहरलाल नेहरू उद्योग केंद्रात ठेवले जाते. गुन्ह्यात दोषी ठरविलेल्या विधी संघर्षग्रस्त मुलांना 'विशेषगृहात' ठेवले जातात. तर कच्चे विधी संघर्षग्रस्त मुलांना (अंडर ट्रायल) न्याय मंडळाच्या आदेशाने पुनर्वसनासाठी 'निरीक्षण गृहात'ठेवले जातात.

आजच्या मुलांवर सोशल मीडिया, हिंसक चित्रपट, वेबसीरिज आणि गेम्सचा प्रभावही मोठ्या प्रमाणात पडत आहे. अनेकदा मुलांना गुन्हेगारी व हिंसक जीवनशैली आकर्षक वाटते. खून, मारामारी, चोरी यांचे दृश्यात्मक प्रदर्शन पाहून त्यांच्यात नकळत तशा वर्तनाची नक्कल करण्याची प्रवृत्ती तयार होते. यातून त्यांना गुन्हा करण्याची भीती राहात नाही, उलट हिरोइझम वाटू लागते. त्यामुळे पालक आणि शिक्षकांनी मुलांच्या मोबाईल वापरावर लक्ष ठेवणे, संवाद वाढवणे व मार्गदर्शन करणे आवश्यक आहे.

**पुनर्वसनाच्या प्रयत्नांची कमतरता**

सरकारकडून बालकांना सुधारण्यासाठी शालेय व व्यावसायिक कोर्स, मानसिक मार्गदर्शन व सामाजिक उपक्रम राबविले जातात. मात्र त्याचा प्रभाव मर्यादित आहे. कारण सुधारगृहातून बाहेर पडल्यावर त्यांना समाजात पुन्हा व्यसनाधीनता, बेरोजगारी व वाईट संगती हाच अनुभव येतो. त्यासाठी सुधारगृहात मिळालेली शिकवण व समाजात जगण्यासाठी आवश्यक वातावरण यात दरी निर्माण होते. या दरीतून पुन्हा गुन्हेगारी उगम पावते. म्हणूनच पुनर्वसनाच्या प्रयत्नांना दीर्घकालीन आधार, रोजगाराची हमी आणि मानसिक सल्लामसलत यांची जोड देणे अत्यावश्यक आहे.

**बालकांमधील वाढत्या गुन्हेगारीवर नियंत्रण**

मिळवण्यासाठी शासन, समाज, पालक आणि शाळा सर्वांनी मिळून काम करण्याची गरज आहे. फक्त पोलिसांवर किंवा सुधारगृहांवर अवलंबून राहून प्रश्न सुटणार नाही. टोळ्या ज्या मातीमध्ये जन्म घेतात ती म्हणजे गरिबी, अशिक्षण, व्यसन आणि राजकीय स्वार्थ – हाच खरा प्रश्न आहे. ही जमीन बदलल्याशिवाय गुन्हेगारीवर अंकुश बसणार नाही.

# आभासी आणि खरा मान्सून कसा ओळखावा?

मान्सून हा शब्द अरबी भाषेतून आला आहे. मौसिम या शब्दाचा अरबी भाषेत अर्थ 'ऋतू' किंवा 'हंगाम' असा होतो. नैर्ऋत्य मोसमी वार्यांना आणि त्यासोबत बरसणार्या पावसाला 'मान्सून' हे नाव ब्रिटिशांच्या आगमनानंतर प्राप्त झाले. समुद्रावरून येताना हे वारे मोठ्या प्रमाणात बाष्प आणतात. अनुकूल स्थितीमध्ये या बाष्पाचे रूपांतर ढगांमध्ये होते. या ढगांना योग्य तो थंडावा मिळाला की ते जलधारा बनून पडतात, त्यालाच आपण पाऊस म्हणतो आणि हाच तो 'मान्सूनचा पाऊस' होय.



पाऊस ही एक वातावरणामधली एक प्रक्रिया आहे. जून-जुलैमध्ये मान्सून हिमालयापर्यंत धडकतो. आपल्या कृषिप्रधान भारत देशाचा जुलै ते ऑक्टोबर असा खरीप हंगाम यावर अवलंबून असतो. त्यानंतर त्याचा परतीचा प्रवास सुरू होतो. यावेळी प्रामुख्याने बंगालच्या उपसागरातील बाष्पामुळे आणि 'ईशान्य मोसमी' वार्यामुळे 'रिटर्न म्हणजे परतीचा मान्सून' पाऊस देतो. या पावसावर ऑक्टोबर ते मार्च असा रब्बी हंगाम पिकतो.

अनेकदा शेतकरी मान्सून पुर्व पावसाला मान्सून समजून नियोजन व पेरणी करून मोकळा होतो आणि दुबार पेरणीचे संकट ओढावून आत्महत्या करतो. वादळाच्या प्रभावामुळे मान्सून लवकर येत असल्याचा केवळ आभास निर्माण होत आहे. अशा 'आभासी मान्सून' पासून सावध रहावे. गेल्या वीस वर्षात वेगाने बदललेल्या मान्सून व वादळांच्या पॅटर्न मुळे मान्सून निकष पुन्हा तपासून पाहण्याची गरज आहे. हवामान खात्यातील सकारात्मक बदल, प्रसारमाध्यमांनी घडवून आणलेल्या खुल्या वैज्ञानिक चर्चा व शेतकरी जनतेची लाईव्ह प्रश्नोत्तरे यातूनच कृषी प्रधान भारत देश आत्मनिर्भर होईल. भारत हवामान विभाग गेल्या १४५ वर्षांपासून शेतकरी व जनतेच्या सेवेसाठी अहोरात्र परिश्रम घेत आहे. हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार मान्सूनचे आगमन पाहून शेतकर्यांच्या शेती कामांचे नियोजन व पेरणीचा निर्णय ठरतो. अचूक हवामान माहितीच्या जोरावर कृषी क्रांती घडली आहे. कृषी प्रधान भारत देशात शेतकऱ्यांना पिकांसाठी मान्सून पाऊस आवश्यक आहे तसेच त्याची खरी माहिती आवश्यक आहे. यावर्षी निसर्ग वादळामुळे मान्सून लांबणीवर अशी घोषणा झाली. नंतर अवघ्या काही तासांत मान्सून कर्नाटकला पोहोचला ही हवामान खात्याची घोषणा संशयास्पद व शंका निर्माण करणारी ठरते. केरळमधील आठ केंद्रांवर अडीच मिलीमीटर पावसाची नोंद होणे असे निकष वादळी पावसाने केवळ पुर्ण झाले म्हणून आभासी मान्सूनलाच खरा मान्सून असे घोषित करण्यात येत आहे. आणि तो भारतीय शेतीला अतिशय आत्मघातकी ठरू शकतो.

मान्सूनपूर्व पाऊस, मान्सूनचा पाऊस आणि मान्सूनउत्तर पाऊस अशी तीन टप्प्यांत पावसाची वर्गवारी करता येऊ शकते. याशिवाय अचानक येणारा अवकाळी पाऊस काय? हे शेतकर्यांनी समजून घेतले पाहिजे. वृत्तपत्रातील बातम्या कधीकधी नव्हे तर अनेकदा शेतकरी आणि सामान्य माणसाच्या मनात गोंधळ निर्माण करतात. म्हणून पावसाला समजून विचार करणे महत्त्वाचे आहे.

**१. मान्सूनपुर्व पाऊस**

यालाच प्री मान्सून रेन म्हणजेच वळीवाचा पाऊस असेही म्हणतात. ढोबळ मानाने मार्च ते मे आणि मान्सून पॅटर्न बदलल्याने सध्या जून मध्ये ही होणारा पाऊस हा मान्सून पुर्व / वळवाचा पाऊस होय. वातावरणातील तापमान हवेचा दाब आर्द्रता आदी घटकांच्या लक्षणीय बदलामुळे अस्थिरता वाढल्याने हा पाऊस होतो. अजस्र क्युमुलोनिंबस प्रकारच्या ढगांमुळे हा पाऊस होतो. वातावरणातील अस्थिरतेमुळे वादळीवारे, गडगडाट व कडकडाट असे विजांचे तांडव, गारा किंवा गारपीट, आकाशात ढगांचे पुंजके वेगवेगळ्या रंगछटा वा शेडमध्ये दिसणे ही हा पाऊस ओळखण्याची साधी लक्षणे किंवा खूण आहे. हा पाऊस दोन प्रकारे कोसळतो.

अ) दिवसभर उष्णता वाढल्यामुळे दुपारी १२ वाजेनंतर आणि जास्त करून २ वाजेनंतर हवा तापल्याने ऊर्ध्व झोत निर्माण होत खालून वरच्या दिशेने हवेचा प्रवास होऊन अस्थिरतेमुळे दिवसा पडतो.

ब) सायंकाळी सुर्य मावळल्यानंतर हवा थंड होऊन वरून खालच्या दिशेने येऊ लागल्याने ढगात घुसळण होत अस्थिरतेने रात्री ते पहाटे सुर्य नसतांना पाऊस पडतो.

**२. मान्सूनचा पाऊस**

ढगांचे पुंजके यात दिसत नाहीत तर आकाश समान एका रंगांच्या शेडमध्ये काळपट दिसते. पाऊस रिपरिप पडत राहतो. मान्सूनपूर्व पावसातली कुठलीच लक्षणे दिसत नाहीत, कारण वातावरण स्थिर झालेले असते.

**३. मान्सून उत्तर पाऊस**

हाच पाऊस मान्सून पश्चात किंवा पोस्ट मान्सून म्हणून पण ओळखला जातो. यात मान्सूनपुर्व पावसाप्रमाणेच सर्व लक्षणे वातावरणात असतात. ढोबळ मानाने याचा कालावधी ऑक्टोबर व नोव्हेंबर असा असून याची तीव्रता कमी असते.

**४. अवकाळी पाऊस**

डिसेंबर ते फेब्रुवारी या कालावधीत होणाऱ्या पावसाला अवकाळी पाऊस म्हणतात. हिवाळी पाऊस असेही याला कधीकधी संबोधतात.

**असा जाहीर होतो मान्सून!**

हवामान खात्याच्या अंदाजानुसार जर केरळमधील आठ केंद्रांवर अडीच मिलीमीटर पावसाची नोंद झाली, तर मान्सूनचे आगमन घोषणा होते. दरवर्षी १० मे नंतर मिनिकॉय, अमिनी, तिरुअनंतपुरम, पुनालुर, कोल्लम, अल्लापुझ्झा, कोट्टयम,कोची, त्रिसूर, कोझिकोडे, थालासेरी, कन्नुर, कुडुलु आणि मंगलोर यावेधशाळांच्या क्षेत्रापैकी किमान आठ ठिकाणी सलग दोन दिवस अडीच मिलीमिटर किंवा त्याहून अधिक पाऊस पडल्यास केरळमध्ये मान्सूनचे आगमन झाले, असे जाहीर केले जाते. यामुळे मान्सूनपूर्व पावसालाच मान्सून समजून शेतकर्यांनी पेरणी केल्यास दुबार पेरणीचे संकट ओढवून आर्थिक फटका बसू शकतो. पेरणीचा निर्णय घेतांना शेतकरी बांधवांनो आभासी मान्सून पासून सावधान असा सबूरीचा सल्ला ही कृषी व तंत्रज्ञान अभ्यासक म्हणून द्यावासा वाटतो.

# मराठे विद्यालयातील मुलांनी बनविल्या पर्यावरणपूरक आकर्षक गणपती मूर्ती



मराठे विद्यालयातील मुला मुलींनी शाडू माती पासून बनवलेल्या सुंदर गणपती मुर्त्या.

**पुणे । प्रतिनिधी**

खराडी येथील गेनबा सोपानराव मोझे संस्थेच्या सुंदरबाई मराठे विद्यालयातील मुला मुलींनी दरवर्षी प्रमाणे. या ही वर्षी शाडू माती पासून गणपती बनविले.

विद्यालयातील कला शिक्षक श्री जेम्स साखरे आणि इयत्ता आठवी नववी मधील मुलांनी गेली पंधरा दिवसापासून शाडू ची माती शाळेत आणण्यापासून, माती मळून साच्यामध्ये भरणे असेल, वॉटर कलर च्या साहाय्याने रंगकाम करणे असो सर्व कलाकारी करून आकर्षक गणपती तयार केले आहे.

सध्या सर्वत्र प्लास्टर ऑफ पॅरिस पासून गणपती बनविले जातात, रासायनिक रंगाचा वापर केला जातो, त्यामुळे पाणी व जमीन मोठ्या प्रमाणात प्रदूषित होते. मासे जलचर प्राण्याचे आरोग्य धोक्यात येते. पर्यावरणाची हानी होते, ते होऊ नये म्हणून गेली वीस वर्षांपासून शाळे मार्फत पर्यावरण पुरक गणपती तयार करून समाजामध्ये योग्य संदेश दिला जात आहे. शाळेत मुले पर्यावरणपूरक गणपती उत्सव साजरा करतात, सजावटी साठी पर्यावरण पुरक वस्तूचा वापर केला जातो. विद्यार्थ्यांमार्फत मंडळांना भेटी देऊन निर्माल्य गोळा करून शाळेत जमा केले जाते व त्या पासून कंपोस्ट खत तयार केले जाते. या समाज उपयोगी उपक्रमाबद्दल सहभागी विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांचे कौतुक केले.

## शून्य – वर्तुळ – पूज्य !

शून्य आणि वर्तुळ
यात मोठा फरक
वाढता वाढता शून्य
तयार होते वर्तुळ !

जन्मापूर्वी मानव
एक शून्य असते
जन्मानंतर सुद्धा
ज्ञानप्राप्ती पर्यंत
ते शून्यच असते !

शुन्यापुढे जेंव्हा
एक उभा राहतो
तेंव्हा त्याची तो
कमत वाढवतो

मोठ्या कष्टाने
शुन्या मधूनच
आपले हे जग
निर्माण करतो !

आपल्या भावता
नात्यांचे मैत्रीचे
एक मोठे वर्तुळ
आखत असतो !

शेवटी एक दिवस
असा उगवतो
वर्तुळ भेदून तो
जीव बाहेर पडतो !

आणि शेवटी
वर्तुळ संपते
शून्य होत होत
आता ' पूज्य ' होते !

**– बाळकृष्ण बाचल**
विद्यानगर पुणे ३२
भ्रमणध्वनी – ९३७३३१०९२१

## बैलपोळा

आज आहे माझा सण
लाड करतील सर्वजण
वर्षभर करतो मी काम
पण आज आहे आराम

जसा तुमचा वाढदिवस
तसाच माझाही दिन खास
बैलपोळ्या निमित्त मी तयार
प्रेम, माया द्या मजला अपार

सजवतील मला शेतकरी
बच्चेकंपनी आणि गावकरी
झूल बाशिंग आणि घुंगर माळा
अंगाला लावतील रंग पिवळा

शेतीत करीन मी कष्ट
ठेवा मला धष्टपुष्ट
कधीच मारू नका चाबूक
होईन मी आज्ञाधारक

आरती माझी ओवाळी
खायला देती पुरणपोळी
मिरवणूक काढतील वाजतगाजत
उत्साह असे मनामनात

**✻ श्री. सुदाम कृष्णाजी विश्वे,**

# सुमीत राघवनचा सरकारला चिमटा : 'कुत्री-कबुतरांपेक्षा खरे प्रश्न महत्वाचे!'



प्रसिद्ध मराठी अभिनेता सुमीत राघवन याने रस्त्यांच्या दुरवस्थेवर तीव्र नाराजी व्यक्त करत सोशल मीडियावर एक व्हिडिओ शेअर केला आहे. या व्हिडिओत त्याने थेट केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना टॅग करत रस्त्यांच्या खराब स्थितीवर उपाय सुचवला आहे.

अभिनेत्याची ही पोस्ट सोशल मीडियावर व्हायरल झाली असून, सोशल मीडियावर याची चर्चा सुरु आहे. सुमीत राघवनने आपल्या व्हिडिओत रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे होणाऱ्या त्रासावर भाष्य केले आहे. त्याने जर्मनीत वापरल्या जाणाऱ्या एका खास तंत्रज्ञानाचा उल्लेख केला, ज्याद्वारे रस्त्यांचे बांधकाम अधिक टिकाऊ आणि दर्जेदार होते. त्याने गडकरी आणि फडणवीस यांना विनंती केली आहे की, अशा तंत्रज्ञानाचा अवलंब करून महाराष्ट्रातील रस्त्यांची दुरवस्था दूर करावी. सुमीतचा हा व्हिडिओ सामाजिक प्रश्नांवर रोखठोक मत मांडणारा असून, त्याने यापूर्वीही अशा मुद्द्यांवर आपली परखड मते व्यक्त केली आहेत.

व्हिडिओवर सुमीत राघवनने लिहिलं की, रस्त्यावरची कुत्री, कबुतरं, हिंदी सक्ती यापेक्षा आपल्या देशात आणि राज्यात ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. कृपा करून हे बघा..

सुमीतच्या या पोस्टला सोशल मीडियावर मोठा प्रतिसाद मिळत आहे. अनेक नेटकऱ्यांनी त्याच्या या पुढाकाराचे कौतुक केले आहे, तर काहींनी रस्त्यांच्या दुरवस्थेवर सरकारला धारेवर धरले आहे. या व्हिडिओने नागरिकांमध्ये रस्त्यांच्या समस्येबाबत पुन्हा एकदा चर्चेला तोंड फोडले आहे. महाराष्ट्रातील अनेक शहरांमध्ये, विशेषत: पुणे आणि मुंबईसारख्या महानगरांमध्ये, रस्त्यांवरील खड्डे आणि खराब बांधकाम हा कायमचा चर्चेचा विषय आहे. पावसाळ्यात ही समस्या आणखी गंभीर होते, ज्यामुळे वाहनचालकांना आणि पादचाऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागतो. सुमीतने या समस्येकडे लक्ष वेधत सरकारला तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

दरम्यान, सुमीतच्या या आवाहनानंतर गडकरी आणि फडणवीस यांच्याकडून काय प्रतिसाद मिळतो, हे पाहणे उत्सुकतेचे ठरेल. सुमीत राघवनच्या या पोस्टमुळे अनेक नागरिकांनीही सोशल मीडियावर आपल्या परिसरातील खराब रस्त्यांचे फोटो आणि व्हिडिओ शेअर करत सरकारचे लक्ष वेधण्यास सुरुवात केली आहे.

'दैनिक महा मेट्रो', मालक, प्रकाशक, संपादक दिलीप किसन कुऱ्हाडे, यांनी श्री समर्थ प्रिंटर्स, शॉप नंबर १, बेसमेंट वर्तक अपार्टमेंट, ४९९, शनिवार पेठ, पुणे– ४११०३० येथे छापून फ्लॅट नंबर ९, फ्रेंन्ड्स पॅराडाईज, शिरोळे रोड, शिवाजीनगर, पुणे ४११००४ येथे प्रकाशित केले.
वृत्तपत्रात छापलेल्या बातम्या, लेख, छायाचित्रे व जाहिराती यांच्याशी संपादक सहमत असेल असे नाही. कायदेशीर प्रकरणे पुणे न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.
मालक, प्रकाशक आणि संपादक दिलीप किसन कुऱ्हाडे – ९९२२९३०१९५, कार्यालय संपर्क क्रमांक : ९९७०६८८८६५ ( पी.आर.बी. कायद्याअंतर्गत बातम्याच्या निवडीसाठी जबाबदार.) Email : Mahametronews.pune1gmail.com

This 'Daily Maha Metro', Owner, Publisher by Dilip Kisan Kurhade printed at Shree Samarth Printers, Shop No. 1, Basement Vartak partment, 499, Shaniwar Peth, Pune 411030, Published from Flat No. 9, Friends Paradise Society, Shirole Road, Shivajinagar, Pune-411004.The editor does not necessarily agree with the news, articles, photographs and advertisements printed in the newspaper. Legal matters will be resolved under Pune Courts. Owner, Publisher Editor Dilip Kisan Kurhade Contact No. - 9922930195, Office Contact No. - 9970688865 (Responsible for selection of news under PRB ct.) Email. - Mahametronews.pune@1gmail.com

## महत्वाचे...

### दुपारी उजेडात जबरी चोरी!

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यात पुन्हा एकदा दुचाकीवरून सोनं आणि मोबाईल हिसकावण्याच्या घटना घडल्या आहेत. वाघोली परिसरात ३९ वर्षीय महिलेच्या गळ्यातील तब्बल ७० हजार रुपयांचे सोन्याचे मंगळसूत्र दुपारी एक वाजताच्या सुमारास केसनंद रोडवरून दोन अज्ञात इसमांनी दुचाकीवरून हिसकावून नेले. तर साधू वासवानी चौकात ४९ वर्षीय व्यक्तीचा ५० हजार रुपयांचा मोबाईल चोरट्यांनी अगदी गर्दीच्या ठिकाणी पाठीमागून येऊन हिसकावला. दोन्ही प्रकरणात चोरटे फरार असून पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत.

### ऑनलाईन ट्रेडिंगच्या आमिषाला बळी पडून ४६ लाखांची फसवणूक

**पुणे । प्रतिनिधी**

ऑनलाईन शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक केल्यास जादा परतावा मिळेल, असे आमिष दाखवून कर्वेनगर परिसरातील ६१ वर्षीय इसमाची तब्बल ४६ लाख २० हजार रुपयांची फसवणूक झाली आहे. १७ जून ते २४ जुलै या कालावधीत मोबाईल ॲप आणि ऑनलाईन माध्यमातून विश्वास संपादन करून ही फसवणूक करण्यात आली. गुंतवणूक केल्यास मोठा नफा मिळेल, अशा गोड बोलण्यांना बळी पडून संबंधित व्यक्तीने रक्कम अदा केली. मात्र परतावा न मिळाल्याने अखेर हा प्रकार पोलिसांकडे उघडकीस आला. अलंकार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या विविध कलमांतर्गत तपास सुरू आहे. वरीष्ठ पोलीस निरीक्षक सुनिता रोकडे या पुढीलतपासकरतआहेत.

### हांडेवाडीतील बांधकाम साईटवर मजुराचा दुर्दैवी मृत्यू

**पुणे । प्रतिनिधी**

हांडेवाडी तुळजाभवानी मंगल कार्यालयाजवळील अर्णव डीपीओ सर्व्हे नं. १३ या बांधकाम साईटवर मोठा प्रकार घडला. प्लंबिंगचे काम करत असताना कुंजीरवस्ती, मांजरी बु. येथे राहणारा अजय नंदलाल मौर्या (वय ३०) याचा विजेच्या धक्क्याने मृत्यू झाला. साईटवर काम सुरू असताना कामगारांना सुरक्षिततेची साधने – हेल्मेट, सेफ्टी बेल्ट, सुरक्षा जाळी – न पुरवता निष्काळजीपणे काम घेतल्याचा आरोप बांधकाम व्यावसायिक व ठेकेदारावर आहे. या बेपर्वाईमुळेच मजुराचा जीव गेला असल्याची माहिती पोलिसांनी दिली असून गुन्हा दाखल करण्यात आलाआहे.

### तुळशीबागेत खरेदीसाठी आलेल्या महिलेच्या मंगळसूत्रावर डल्ला

**पुणे । प्रतिनिधी**

तुळशीबागेत खरेदीसाठी आलेल्या पिंपरी-चिंचवड येथील ५३ वर्षीय महिलेच्या पर्समधून अज्ञात चोरट्याने तब्बल २ लाख २५ हजार रुपयांचे सोन्याचे मंगळसूत्र चोरून नेल्याची घटना घडली. ही घटना गुरुवारी दुपारी सव्वा तीन ते साडेचारच्या सुमारास मुळचंद मिल, लक्ष्मी रोड परिसरात घडली. महिला खरेदीत गुंतलेली असताना चोरट्याने नजर चुकवून पर्समधील सोन्याचे मंगळसूत्र लंपास केले. या प्रकरणी विश्रामबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, अज्ञात चोरट्याचा शोध सुरू आहे.

# जीआय नामांकन प्राप्त पिकांच्या पॅकेजींग व ब्रँडींगसाठी मदत करण्यास शासन सकारात्मक : फलोत्पादन मंत्री गोगावले

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यामध्ये उत्पादित होत असलेल्या फळ पिकाची निर्यात वाढविण्यासाठी फळ पिकाचे क्लस्टर वाढवावेत तसेच जीआय नामांकन प्राप्त पिकांच्या पॅकेजींग व ब्रँडींगसाठी मदत करण्यास शासन सकारात्मक असून त्या अनुषंगाने प्रस्ताव तयार करण्यात यावा, अशा सूचना राज्याचे रोजगार हमी योजना, फलोत्पादन व खार भूमि विकास मंत्री भरत गोगावले यांनी केले.

साखर संकूल येथे आयोजित राज्यातील फलोत्पादन विभागाच्या आढावा बैठकीत श्री. गोगावले बोलत होते. बैठकीस कृषि आयुक्त डॉ. हेमंत वसेकर, संचालक, विस्तार व प्रशिक्षण रफिक नाईकवाडी, संचालक कृषिप्रक्रिया व नियोजन विनयकुमार औटे आदी उपस्थित होते.

गोगावले म्हणाले, प्रत्येक विभागाची भौगोलिक परिस्थिती बघून त्यानुसारच कामकाज करावे. फलोत्पादन वाढीसाठी नाविन्य पूर्ण उपक्रम राबवून विभागाचा महसूल वाढवावा. राज्यातील फलोत्पादनाचे क्षेत्र वाढविण्यासाठी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करावे.

शासनाच्या रोपवाटीका बळकट करण्यासाठी काय उपाययोजना करण्यात येतील याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करावा. प्रत्येक रोपवाटिकेस काही ठरावीक खेळते भांडवल ठेवता येईल का या संदर्भात तपासणी करुन प्रस्ताव शासनाससादर करावा, अशा सूचना त्यांनी दिल्या. कोकणामध्ये मोठया प्रमाणावर सुपारीची लागवड होत आहे. या पिकाचा या योजनेमध्ये समावेश करण्यात यावा. महाराष्ट्र ग्रामीण हमी योजनेंतर्गत परमीटवर शेतकऱ्यांच्या कलमे-रोपे पुरवठा केल्यानंतर त्याची कुशलची रक्कम शासकीय रोपवाटीकेस देण्यासंदर्भात व खजूर या पिकाचा समावेश या योजनेमध्ये करण्याबाबत शेतकऱ्यांची मागणी असल्याने यासंदर्भात योग्य ती कार्यवाही करण्याच्या सूचना श्री. गोगावले यांनी दिल्या. या बैठकीस ठाणे, नाशिक, पुणे छत्रपती संभाजीनगर, लातूर, विभागांचे विभागीय कृषि सह संचालक उपस्थित होते तर अमरावती व नागपूर विभागाचे कृषि सहसंचालक दूरदुष्यप्रणालीव्दारे उपस्थित होते.



### निगडीत ज्वेलर्समध्ये ४४ लाखांची फसवणूक

**पुणे । प्रतिनिधी**

निगडी प्राधिकरण परिसरात असलेल्यासत्यम ज्वेलर्सच्या चांदी विभागात तब्बल ३९.२८६ किलो चांदी गायब झाल्याची आणि त्यामुळे तब्बल ४४,१०,६६३/- ची फसवणूक झाल्याची मोठी घटना उघडकीस आली आहे. आिरोपीसागर भास्कर पाटीलहा सत्यम ज्वेलर्समध्ये मॅनेजर म्हणून काम करत होता. मात्र, त्याने कामाच्या ठिकाणी विश्वासघात करून, जाणीवपूर्वक चांदी लंपास केल्याचे समोर आले आहे. ही घटना सन २०२३ पासून ते २० जून २०२५ या कालावधीत घडली असून, तपासातसुमारे ३९ किलो २८६ ग्रॅम चांदी (किंमत ४४ लाखांपेक्षा जास्त) असा मोठा अपहार झाल्याचे स्पष्ट झाले आहे. या प्रकरणी निगडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून, पुढील तपाससपोनि राहुल गोंधेयांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

## वडार समाजाच्या वतीने ॲड. प्रकाश आंबेडकर यांचा पुण्यात भव्य नागरी सत्कार : अनिल जाधव

**पुणे । प्रतिनिधी**

आंदोलनात पोलीस हल्ल्याच्या प्रकरणी शहीद झालेला सच्चा आंबेडकरी कार्यकर्ता शहीद सोमनाथ सूर्यवंशी यांना न्याय मिळावा यासाठी रस्त्यावरून व नंतर थेट कोर्टात स्वतः लढाई लढणारे वंचित आघाडीचे नेते आदरणीय बाळासाहेब तथा प्रकाश आंबेडकर यांचा पुण्यातील गणेश कला रंगमंच येथे जाहीर भव्य नागरी सत्कार राजभरातील हजारो वडार समाज व बहुजन समाजाच्या वतीने होणार असल्याचे वडार समाज संघाचे अध्यक्ष व वंचितचे



नेते अनिल जाधव यांनी सांगितले आहे.

रस्त्यावरून ते थेट सर्वोच्च न्यायालयापर्यंत वडार समाजाचे शहीद सोमनाथ सूर्यवंशी यांच्या न्याय-हक्कासाठी सातत्याने लढा देऊन न्याय मिळवून दिल्याबद्दल महाराष्ट्रातील समस्त वडार समाजाच्या वतीने आदरणीय ॲड.बाळासाहेब आंबेडकर साहेब यांचा जाहीर नागरी सत्कार समारंभ आयोजित करून वडार समाज आपल्या भावना व्यक्त करणार आहे .या कार्यक्रमाचे आयोजक वडार समाजाचे नेते अनिल जाधव असणार आहेत. हा समारंभ सोमवार दिनांक २५ ऑगस्ट २०२५ रोजी पुण्यातील गणेश कला क्रीडा मंच येथे दुपारी ३ वाजता आयोजित करण्यात येत आहे. तरी या ऐतिहासिक समारंभास सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

## काळेवाडीतील 'मोफत महाआरोग्य शिबिराला' उत्स्फूर्त प्रतिसाद...

**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वैद्यकीय विभागाच्या वतीने नागरी आरोग्य पोषण दिनानिमित्त काळेवाडी येथील न्यू जिजामाता रुग्णालयातर्फे 'मोफत महाआरोग्य शिबिराचे' आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. शिबिरामध्ये २०० हून अधिक नागरिकांनी विविध आरोग्य तपासण्या व उपचारांचा लाभ घेतला.

महापालिका आयुक्त शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या शिबिराचे उदघाटन महापालिकेचे आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे यांनी केले.

या शिबिरात नागरिकांसाठी वजन, उंची, शरीर वस्तुमान निर्देशांक (बीएमआय), सर्व प्रकारच्या रक्त तपासण्या, नियमित लसीकरण, छातीचा क्ष-किरण, थुंकी तपासणी, गरोदर मातांची तपासणी तसेच 'आभा' व 'आयुष्मान' कार्ड नोंदणी या सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या.

> **पिंपरी चिंचवड महापालिकेच्या माध्यमातून नागरिकांच्या दारी आरोग्यसेवा पोहोचवण्याचा प्रयत्न केला जात आहे. या अनुषंगाने विविध आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. काळेवाडीत झालेल्या शिबिराला मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद हे या उपक्रमाच्या यशाचे प्रतीक आहे.**
> **– विजयकुमार खोराटे,**
> **अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका**

> **मोफत महाआरोग्य शिबिरांमुळे नागरिकांना विविध तपासण्या व उपचार एकाच छताखाली उपलब्ध होत आहेत. या उपक्रमामुळे आजाराचे लवकर निदान होऊन योग्य उपचार शक्य होत आहेत. शिबिरात तपासणी केल्यानंतर संबंधित व्यक्तीला आवश्यक औषधे मोफत देण्यात येत आहेत.**
> **– डॉ. लक्ष्मण गोफणे,**
> **आरोग्य वैद्यकीय अधिकारी, पिंपरी चिंचवड महापालिका**

## "स्वच्छ सन्मान व स्वच्छ सर्वेक्षण २०२५-२६ पूर्वतयारी" या कार्यक्रमाचा उपमुख्यमंत्री पवार यांच्या हस्ते आज शुभारंभ...

### चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे कार्यक्रमाचे आयोजन...

**पुणे । प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने स्वच्छ महाराष्ट्र/भारत अभियान (नागरी) अंतर्गत स्वच्छ सन्मान सोहळा व स्वच्छ सर्वेक्षण २०२५-२६ ची पूर्वतयारी उपक्रमाचा शुभारंभ महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या शुभहस्ते होणार आहे. चिंचवड येथील प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह शनिवार दि.२३ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी २ वाजता या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिली.

या कार्यक्रमासाठी केंद्रीय सहकार व नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, कृषी मंत्री



दत्तात्रय भरणे, विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांची विशेष उपस्थित राहणार आहे. तसेच खासदार मेधा कुलकर्णी, सुनेत्रा पवार, सुप्रिया सुळे, श्रीरंग आप्पा बारणे, डॉ. अमोल कोल्हे, आमदार अरुण लाड, उमा खापरे, जयंत आसगावकर, योगेश टिळेकर, अमित गोरखे, दिलीप वळसे पाटील, भीमराव तापकीर, विजय शिवतारे, महेश लांडगे, राहुल कुल, बापूसाहेब पठारे, सुनिल कांबळे, चेतन तुपे, शरद सोनवणे, सिद्धार्थ शिरोळे, सुनिल शेळके, बाबाजी काळे, हेमंत रासणे, शंकर मांडेकर, शंकर जगताप, ज्ञानेश्वर कटके, महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे सदस्य ॲड. गोरक्ष लोखंडे तसेच माजी लोकप्रतिनिधी, पदाधिकारी व माजी नगर सदस्य, नगर सदस्या आदी मान्यवर या कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत.

भारत सरकारच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या स्वच्छ भारत अभियान अंतर्गत घेतलेल्या "स्वच्छ सर्वे क्षण २०२४-२५ मध्ये पिंपरी चिंचवड शहर देशात ७ वे तर राज्यात प्रथम क्रमांकाचे शहर ठरले आहे. याशिवाय ७ स्टार कचरामुक्त शहर तसेच वॉटर प्लस मानांकन देखील शहराला मिळाले आहे.याबददल केंद्र शासनाच्या वतीने पिंपरी चिंचवड महापालिकेला पुरस्कार देऊन सन्मानित देखील केले आहे.

या यशस्वी कामगिरीमध्ये सहभाग घेऊन योगदान देणाऱ्या नागरिक, लोकप्रतिनिधी, अनेक सेवाभावी संस्था, व्यक्ती, महापालिका अधिकारी कर्मचारी आदींचा महत्वपूर्ण सहभाग आहे. या सहभागाबद्दल प्रातिनिधीक स्वरुपातील त्यांचा सन्मान देखील उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते होणार आहे. तसेच यावेळी स्वच्छ सर्वे क्षण २०२५-२६ पूर्वतयारीचा शुभारंभ देखील होणार असून जास्तीत जास्त नागरिकांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहावे, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

## पार्किंगची बनवाबनवी बिल्डरांना भोवणार

**पुणे । प्रतिनिधी**

घर खरेदी केलेल्या ग्राहकाला पार्किंगसाठी बिल्डरकडे चकरा माराव्या लागतात. या चकरा आता थांबणार आहेत. पार्किंग न देणाऱ्या बिल्डराच्या विरोधात ग्राहक आता थेट महारेराकडे तक्रार दाखल करु शकणार आहे.

घर खरेदी करताना ग्राहकांकडून पार्किंगची जादा वसुली करूनही प्रत्यक्षात जागा न देणाऱ्या बिल्डरांना आता महारेरा (महाराष्ट्र रिअल इस्टेट रेग्युलेटरी प्राधिकरण) कडून दणका बसणार आहे. अनेक प्रकरणांमध्ये घरमालकांनी केलेल्या तक्रारीनंतर महारेराने कठोर भूमिका घेत, पार्किंग हा खरेदीदाराचा मूलभूत हक्क आहे. त्याची पळवाट शोधणार्याभ विकासकांविरुद्ध कारवाई अटळच असल्याचे महारेराने सांगितले आहे.

घरखरेदीदारांना पार्किंगसंबंधी अडचणी होऊ नयेत म्हणून पार्किंगची सर्व माहिती सदनिका नोंदणीच्या वेळी दिल्या जाणार्याध वाटप पत्रात (अलोकेशन लेटर) आणि विक्री करारनाम्यांमध्ये जोडणे बंधनकारक आहे. यात पार्किंगचा क्रमांक, आकार (लांबी, रुंदी, उंची), आणि इमारतीतील नेमके ठिकाण नमूद करणे आवश्यक आहे. ४५ चौरस मीटरपर्यंतच्या ८ सदनिकांसाठी एक पार्किंग बंधनकारक आहे. त्यानुसार ४५-६० चौरस मीटर चार सदनिकांसाठी एक पार्किंग, ६०-९० चौरस मीटर दोन सदनिकांसाठी एक पार्किंग, आणि ९० चौरस मीटरपेक्षा मोठ्या सदनिकांसाठी एक पार्किंग आवश्यक आहे.

खुल्या पार्किंगसाठी लांबी आणि रुंदी नमूद करणे बंधनकारक आहे. आच्छादित (कव्हर्ड) पार्किंगसाठी लांबी, रुंदी व उंची नमूद करणे गरजेचे आहे. विकासकांना खुले पार्किंग (ओपन पार्किंग) विकण्यास परवानगी नाही कारण ते कॉमन एरियाचा भाग मानले जाते आणि घरखरेदीदारांना ते मोफत दिले जाते. पार्किंग व्यवस्थेत बीम, आकार किंवा उंचीचे नियम पाळले जात नाहीत तर त्यासाठी महारेराकडून दंडात्मक कारवाई होऊ शकते.

नियोजन प्राधिकरणाने निवासयोग्य प्रमाणपत्र देताना किमान पार्किंगची खात्री करून देणे गरजेचे आहे, अन्यथा पार्किंगसंबंधी वाद निर्माण होतात. महारेराच्या आदेशांनुसार पार्किंगची नोंदणी करारनाम्यासोबत आणि वाटपपत्रासोबत बंधनकारक ठेवण्यात आली आहे, त्यामुळे घरखरेदीदाराला आपले पार्किंग कुठे आणि कसे असेल याची पूर्वकल्पना असते आणि तक्रार करता येते वकासकांनी या मानकांचे काटेकोरपणे पालन केले पाहिजे, सर्व पार्किंग जागा निर्दिष्ट परिमाणांशी जुळतात आणि अचूकपणे दस्तऐवजीकरण केल्या आहेत याची खात्री करणे आवश्यक आहे. दुसरीकडे, वाटपधारकांना स्पष्ट माहितीचा फायदा होतो, ज्यामुळे ते त्यांच्या मालमत्ता खरेदीबद्दल सुज्ञ निर्णय घेऊ शकतात.

## थीम पार्कचे काम वेळेत आणि काटेकोर नियोजनासह पूर्ण करा : अतिरिक्त आयुक्त

### पिंपळे सौदागर येथील राजमाता जिजाऊ उद्यानातील 'वेस्ट टू वंडर थीम पार्क'ला भेट देत घेतला कामाचा आढावा

**पिंपरी । प्रतिनिधी**

वेस्ट टू वंडर थीम पार्कचे काम पुढील दोन महिन्यांत काटेकोर नियोजनासह पूर्ण करा. उद्यानात उभारण्यात येणाऱ्या ऐतिहासिक वास्तूंच्या प्रत्येक प्रतिकृतीचे काम दर्जेदार करण्यात यावे. हे उद्यान अधिक वेगळे आणि वैशिष्ट्यपूर्ण होण्यासाठी प्रत्येक बाबीचे सूक्ष्म नियोजन करण्यात यावे, असे निर्देश पिंपरी चिंचवड महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी दिले.

अतिरिक्त आयुक्त जांभळे पाटील यांनी पिंपळे सौदागर येथील राजमाता जिजाऊ उद्यानातील 'वेस्ट टू वंडर थीम पार्क'ला भेट देत सुरू असलेल्या सर्व कामांची पाहणी करून आढावा घेतला. यावेळी त्यांनी पार्कमधील फूड स्टॉल, नागरिकांसाठी पार्किंगची सुविधा, तिकीट काउंटर, सुशोभीकरणाच्या



दृष्टिने वृक्ष लागवड, वास्तूंची सुरक्षितता, सुरक्षा रक्षकांची नेमणूक, कंपाऊंड भिंतीचे काम, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, रंगरंगोटी तसेच स्थापत्य व विद्युत विभागाशी संबंधित विविध कामांचा सविस्तर आढावा घेतला.

अतिरिक्त आयुक्त जांभळे पाटील म्हणाले, 'वेस्ट टू वंडर थीम पार्क हे पिंपरी चिंचवडकरांसाठी एक वेगळे आकर्षण ठरेल. येथे टाकाऊ वस्तूंपासून उभारल्या जाणाऱ्या प्रत्येक वास्तूची गुणवत्ता उच्च दर्जाची असावी. हे उद्यान अधिक वैशिष्ट्यपूर्ण होण्यासाठी प्रत्येक बाब काटेकोर आणि नियोजनबद्ध पद्धतीने पूर्ण करावी. या उद्यानातील सर्व सुविधा व्यवस्थित असल्या पाहिजेत. पुढील दोन महिन्यांत या उद्यानाचे सर्व काम वेळेत पूर्ण करण्यात यावे,' असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

**टाकाऊ साहित्यापासून उभ्या राहत आहेत ऐतिहासिक वास्तूंच्या प्रतिकृती!**

वेस्ट टू वंडर थीम पार्कात जगभरातील १७ जागतिक दर्जाच्या ऐतिहासिक आणि कलात्मक वास्तूंच्या प्रतिकृती टाकाऊ साहित्यापासून उभारल्या जात आहेत. यामध्ये ताजमहल, आयफेल टॉवर, बुर्ज खलिफा, लीनिंग टॉवर ऑफ पिसा, सिडनी ऑपेरा हाऊस, अजंठा लेणी, ला सागराडा फॅमिलीया, चिचेन इत्झा, पिरॅमिड ऑफ गिझा, पेट्रा ऑफ जॉर्डन, कोलोसियम ऑफ रोम, बिग बेन ऑफ लंडन, अंकोर वट ऑफ कंबोडिया, हंपी चारियट, स्टॅच्यू ऑफ लिबर्टी, ट्रेव्ही फाउंटन आणि माऊंट रश्मोर आदी जगप्रसिद्ध कलाकृती साकारण्यात आल्या आहेत. या प्रतिकृतींमुळे उद्यानाला जागतिक वारशाची झलक मिळणार असून पर्यावरणपूरक पद्धतीने टाकाऊ साहित्याचा अभिनव उपयोग येथे केला जात आहे.

**साधु वासवानी केली पाहणी**

अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी आज पिंपरी चिंचवड महापालिकेच्या ग प्रभागातील साधु वासवानी उद्यानाला भेट देत पाहणी केली. यावेळी त्यांनी उद्यानाचे सुशोभीकरण करण्यावर विशेष भर देण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले. उद्यानातील मोकळ्या जागेत आकर्षक सुशोभिकरण करावे, उद्यानात ठिकठिकाणी सूचना फलक लावण्यात यावेत, दिव्यांगाना प्रवेश सुखकर करण्याच्या दृष्टिने उपाययोजना कराव्यात, पावसामुळे उद्यानात साचणाऱ्या पाण्याची योग्य ती विल्हेवाट लावावी, असे निर्देश अतिरिक्त आयुक्त जांभळे पाटील यांनी दिले.

## डुक्कर आडवे गेल्याने पोलीस अधिकाऱ्याचा भयंकर अपघात

**पुणे । प्रतिनिधी**

सोलापूर महामार्गावर अचानक डुक्कर आडवे गेल्याने पोलीस उपनिरीक्षकाचे चारचाकी गाडीवरील नियंत्रण सुटले व गाडी थेट दुभाजक तोडून समोरून येणाऱ्या ट्रकला धडकली. या अपघातात पोलीस उपनिरीक्षक गंभीर जखमी झाल्याची घटना घडली आहे. सोरतापवाडी ग्रामपंचायत हद्दीतील अल्फा पेट्रोल पंपासमोर आज पहाटे साडेपाच ते सहा वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली आहे.महेश अंबादास गळगटे (वय- ३६, रा. राममंदिर लेन, आष्टी, जि. बीड)असे अपघातात गंभीर जखमी झालेल्या पोलीस उपनिरीक्षकाचे नाव आहे. त्यांच्यावर लोणी काळभोर येथील एका बड्या रुग्णालयात सध्या उपचार सुरू आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, महेश गळगटे हे बार्शी पोलीस ठाण्यात पोलीस उपनिरीक्षक या दर्जाच्या पदावर कार्यरत आहेत. कामानिमित्त आपली चारचाकी गाडी घेऊन आले होते. आज पहाटे पुण्यावरून सोलापूरच्या दिशेने निघाले होते. यावेळी सोरतापवाडी हद्दीतील अल्फा पेट्रोल पंपासमोर आले असता त्यांच्या चार चाकी गाडीला अचानक डुक्कर आडवे गेले. दरम्यान, डुक्कर आडवे आल्याने ते चालवत असलेल्या चारचाकी गाडीवरील नियंत्रण सुटले. गाडी थेट महामार्गावरील दुभाजक तोडून पुण्याच्या बाजूकडे निघालेल्या ट्रकला धडकली. या अपघातात गळगटे यांना गंभीर दुखापत झाली. दरम्यान, सदर अपघाताची माहिती मिळताच कदम रुग्णवाहिकेचे वैभव कदम व रस्त्यावरील नागरिकांच्या मदतीने गळगटे यांना गाडीच्या बाहेर काढून लोणी काळभोर येथील एका बड्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यांच्यावर उपचार सुरू असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती मिळत आहे.